CNR NO- MHSO060020502017

नियमित दिवाणी दावा क्र. ११२/२०१७
योगिता भोसले.
वि.
रामचंद्र भोसले.

## नि. क्र. ९९ वरील आदेश
## (घोषित दि.०४/०२/२०२५)

०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दाखल करुन त्यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादींनी असे नमूद केले की, प्रतिवादी आजारी असल्यामुळे न्यायालयात होवू शकले नाहीत त्यामुळे वादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेण्यात आला नाही. प्रस्तुतचा दावा वाटपाचा असून त्यामध्ये प्रतिवादींचे हक्क गुंतलेले आहेत. सबब दि.०६/११/२०२४ रोजी पारीत झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करण्याची विनंती करण्यात आलेला आहे.

०३] वादीतर्फे प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करुन असे नमूद करण्यात आले की, वादीने दि.१०/०१/२०२३ रोजी सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दि. २६/०३/२०२४ रोजी साक्षीदार क्र.२ यांना तपासलेले आहे. प्रतिवादीने कोणतेही अर्ज न देता उलटतपासाकरीता मुदत घेतली व अंतिमतः दि.०१/०१/२०२५ रोजी प्रस्तुतचा अर्ज सादर केला प्रतिवादी वेगवेगळ्या कारणाने दाव्याचे कामकाज लांबवित असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली. विकल्पेकरुन नमुद करण्यात आले की, अर्ज मंजूर करणे झाल्यास रक्कम रु.५,०००/– खर्च मंजूर करावा.

०४] उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०५] प्रस्तुतचा दावा वाटप होवून मिळणेकरीता सन २०११ मध्ये दाखल करण्यात आलेला असून तो २०१७ मध्ये पुर्ननोंदणीकृत करण्यात आलेला आहे. दि.१३/०६/२०१६ रोजी वादमुद्दे गठित करण्यात आले व दि.१३/०७/२०१८ रोजी अतिरिक्तचा वादमुद्दा गठित करण्यात आला. वादीने वेळोवेळी मुदतीकरीता अर्ज दाखल केले व अंतिमतः दि.१०/०१/२०२३ रोजी साक्षीदार क्र. १ यांचे

सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. दि.२६/०३/२०२४ रोजी साक्षीदार क्र. १ यांचे जादा सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले व दि.२०/०८/२०२४ रोजी पुढील सरतपास नोंदूवन प्रतिवादीच्या विनंतीवरुन पुढील उलटतपास तहकूब करण्यात आला. दि.०६/११/२०२४ रोजी प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ गैरहजर असल्यामुळे त्यांचे विरुध्द 'उलटतपास नाही' चा आदेश पारीत करण्यात आला. दि.२०/१२/२०२४ तर्फे वादीतर्फे साक्षीदार क्र. २ याच्या सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले.

०६] एकुणच वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतरही प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी ब-याच मुदती घेतल्या परंतु उलटतपास घेण्यात आलेला नाही यावरुन हे स्पष्ट होते की प्रतिवादी क्र. १ ते ४ दाव्याचे कामकाज विनाकारण लांबविण्याचा प्रयत्न करीत आहेत. असे जरी असले तरीही प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी असून यामध्ये प्रतिवादींचे मौलिक दिवाणी हक्क गुंतलेले असून मुळ दावा गुणदोषावर निर्णित होण्याकरीता वादीचा उलटतपास घेण्याची संधी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना मिळणे न्याय व गरजेचे आहे. अश्या परिस्थीतीत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करणे न्यायोचित असल्याचे माझे मत झालेले आहे. प्रतिवादीने केलेल्या विलंबामुळे वादीस खर्च रक्कम रु.१,०००/- मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः-

## आ दे श

०१] अर्ज खर्च रक्कम रु. १०००/- लावून मंजूर करण्यात आला.

०२] प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांचे विरुध्द पारीत झालेला 'उलटतपास नाहीचा' आदेश रद्द करण्यात येतो.

AMIT ASHOKRAO KHANDALE Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE Date: 2025.02.04 16:55:27 +0530

दिनांक : ०४/०२/२०२५

(**अमित अ. खंडाळे** )
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| A | Name of the Stenographer | : Shirsikar V. G. |
| b | Court | : Jt. C.J.S.D.,<br>Pandharpur. |
| c | Date of Order | : 04.02.2025 |
| d | Order signed by P.O. on | : 04.02.2025 |
| e | Order uploaded on | : 04.02.2025 |